जाहीर सूचना

आम्ही (ए) **मे. गोल्डन रिॲल्टी (बलराम स्ट्रीट)**, भारतीय भागीदारी अधिनियम, १९३२ च्या तरतुदींनुसार फर्म निबंधक, मुंबई (महाराष्ट्र) यांच्याकडे नोंदणी क्र. एमयू०००२४२५३ अंतर्गत नोंदणीकृत असलेली भागीदारी फर्म, जिचे व्यवसायाचे मुख्य ठिकाण ७०४, ७वा मजला, ताडदेव एअर कंडिशन मार्केट, ताडदेव रोड, मुंबई ४०० ०३४ येथे आहे (यापुढे ''**विकासक**''), यांच्या खालील **परिशिष्टात** अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या स्थावर मिळकतीवर (यापुढे ''**सदर मिळकत**'') नवीन बहुमजली इमारत बांधून सदर मिळकतीचा पुनर्विकास करण्याच्या अधिकाराची तपासणी करीत आहोत. सदर पुनर्विकास हा डिव्हाइन ड्रवेलर्स प्रायव्हेट लिमिटेड (यापुढे ''**मालक**'') यांनी विकासकाच्या नावे दिनांक ३० जानेवारी, २०२५ रोजी निष्पादित केलेल्या विकास करारनाम्यानुसार (यापुढे ''**विकास करारनामा**'') करण्यात येणार आहे; आणि (बी) विकास करारनाम्याअंतर्गत विकास हक्कांच्या संदर्भात तसेच सदर मिळकतीवर बांधण्यात येणाऱ्या नवीन इमारतीमधील विकासकाच्या विक्री घटक क्षेत्राच्या संदर्भात (म्हणजे मालक आणि सदर मिळकतीतील भाडेकरू/भोगवटादार यांना वाटप करण्यात येणाऱ्या बांधलेल्या जागांव्यतिरिक्त इतर सर्व जागा) (यापुढे एकत्रितपणे ''**विकासकाचे अधिकार**''), त्यासंदर्भात गहाण निर्माण करण्यासह इतर मार्गांनी तृतीय पक्षाचे हक्क निर्माण करण्याच्या विकासकाच्या अधिकाराची तपासणी करीत आहोत.

सदर मिळकतीच्या किंवा तिच्या कोणत्याही भागाच्या संदर्भात विक्री, अदलाबदल, गहाण, विकास हक्क प्रदान करणे, भार, बक्षीस, न्यास, देखभाल, कब्जा, धारणाधिकार किंवा अन्य कोणत्याही प्रकारे कोणताही हक्क, हक्कनामे, हितसंबंध किंवा दावा असलेल्या कोणत्याही व्यक्तींना किंवा सदर मिळकतीवर विकासकाकडून करण्यात येणाऱ्या पुनर्विकासास आणि/किंवा सदर मिळकतीवर बांधण्यात येणाऱ्या नवीन इमारतीमधील विकासकाच्या अधिकारांच्या संदर्भात, त्यासंदर्भात गहाण निर्माण करण्यासह इतर मार्गांनी तृतीय पक्षाचे हक्क निर्माण करण्यास कोणताही आक्षेप असलेल्या व्यक्तींना याद्वारे विनंती करण्यात येते की, त्यांनी या सूचनेच्या प्रसिद्धीच्या दिनांकापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत, अशा दाव्याच्या किंवा आक्षेपाच्या समर्थनार्थ कागदपत्रांसह, खाली सही करणाऱ्यांना लॉ स्क्राइब्स, ७०३, डीएलएच प्लाझा, बीटा सोसायटी, एस. व्ही. रोड, अंधेरी (पश्चिम), मुंबई ४०००५८ येथे लेखी स्वरूपात कळवावे. तसे करण्यात कसूर झाल्यास, असा कोणताही दावा किंवा आक्षेप अस्तित्वात नाही, असे समजण्यात आणि मान्य करण्यात येईल; तसेच असे दावे किंवा आक्षेप अस्तित्वात नसलेले/त्याग केलेले/सोडून दिलेले आहेत, असे मानण्यात येईल.

परिशिष्ट

सदर मिळकतीचे वर्णन

मुंबई शहराच्या नोंदणी उपजिल्ह्यातील ताडदेव विभागातील जुना सर्व्हे क्र. १३१ आणि नवीन सर्व्हे क्र. ४/६९३८ तसेच कॅडस्ट्रल सर्व्हे क्र. ८४ असलेली, ३९४.६५ चौ. मीटर किंवा त्याच्या आसपास क्षेत्रफळाची, ग्रँट रोडपासून, लॅमिंग्टन क्रॉस रोड, मुंबई ४०० ००७ येथे असलेली व स्थित जमिनीचा सर्व तो भाग व विभाग.

दिनांक: ३१ ऑक्टोबर, २०२६

लॉ स्क्राइब्स यांच्यासाठी:
सही/-
नील मांडविया
अधिवक्ता आणि सॉलिसिटर.

प्रसिद्धी सूचना

ज्याअर्थी, वरील प्रतिभूतिकरण अर्ज दिनांक २२.१०.२०२६ रोजी माननीय पीठासीन अधिकारी, कर्ज वसुली न्यायाधिकरण-II, मुंबई यांच्यासमोर सुनावणीसाठी सूचीबद्ध करण्यात आला होता, त्यावेळी अर्जदाराने प्रतिवादी क्र. २ ते ५ यांना वृत्तपत्रातील प्रसिद्धीद्वारे सूचना बजावण्याची परवानगी मागण्यासाठी सन २०२६ चा अंतरिम अर्ज क्र. २५८१ दाखल केला होता.

ज्याअर्थी, अर्जदाराने यापूर्वी प्रतिवादी क्र. २ ते ५ यांना पोचपावती देय असलेल्या स्पीड पोस्टाद्वारे सूचना बजावण्याचा प्रयत्न केला होता; तथापि, सदर टपालाद्वारे पाठविलेली कागदपत्रे ''निघून गेले'' असा शेरा मारून परत आली होती. सदर वस्तुस्थिती बजावणीच्या प्रतिज्ञापत्राद्वारे अभिलेखावर आणण्यात आली होती. त्यानंतर, माननीय न्यायाधिकरणाने दिनांक २२.१०.२०२६ रोजीच्या आदेशाद्वारे वृत्तपत्रातील प्रसिद्धीद्वारे सूचना बजावण्यासाठी सन २०२६ चा अंतरिम अर्ज क्र. २५८१ मंजूर केला.

सूचना घ्यावी की, वरील प्रकरणाची सुनावणी दिनांक ०३ डिसेंबर २०२६ रोजी सकाळी ११:०० ए.एम. वाजता माननीय कर्ज वसुली न्यायाधिकरण-II, मुंबई यांच्यासमोर निश्चित करण्यात आली आहे. आपणास याद्वारे उपरोक्त दिनांकास स्वतः किंवा अधिवक्त्यामार्फत उपस्थित राहण्याचे आणि योग्य वाटल्यास सदर प्रकरणात प्रलंबित असलेल्या अंतरिम अर्जांना विरोध करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

पुढील सूचना घ्यावी की, माननीय न्यायाधिकरणाने अंतरिम स्थगिती/संरक्षण पुढील तारखेपर्यंत कायम राहील, असे निर्देश दिले आहेत. आपण उपस्थित राहण्यात कसूर केल्यास, कायद्यानुसार सदर प्रकरणाची सुनावणी करून आपल्या अनुपस्थितीत निर्णय दिला जाऊ शकतो.

आज दिनांक ३० ऑक्टोबर, २०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीने व माननीय न्यायाधिकरणाच्या शिक्क्यानिशी जारी करण्यात आले.

सही/-
निबंधक
मुंबई डीआरटी क्र. २

HDFC BANK

एचडीएफसी बँक लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय : एचडीएफसी बँक हाऊस, सेनापती बापट मार्ग, लोअर परळ (प), मुंबई – ४०० ०१३.
[कॉर्पोरेट ओळख क्रमांक - L65920MH1994PLC080618]
[ई-मेल: shareholder.grievances@hdfc.bank.in] [वेबसाईट: www.hdfc.bank.in]
[दूरध्वनी क्र - 022 39760001 / 0012]

सूचना

याद्वारे ही सूचना देण्यात येते की, खालील समभाग शेअर प्रमाणपत्र हरवले / गहाळ झाले आहेत / सापडण्याजोगे नाहीत असे सूचीत करण्यात आलेले आहे आणि नोंदणीकृत भागधारकांनी / दावेदारांनी प्रतिलिपी शेअर प्रमाणपत्र निर्गमित करण्यासाठी बँके कडे अर्ज केलेला आहे.

अनु. क्र	एल/एफ क्र	भागधारकांची नावे	विभिन्न क्रमांक पासून पर्यंत	प्रमाणपत्र क्रमांक	शेअर्सची संख्या
१	६४०८१२९	अंकुर कपूर	१६५४१७०१-१६५५४१९०	३०६५८	१२४९०

कोणत्याही व्यक्तीस अशा शेअर प्रमाणपत्र / प्रमाणपत्रे यांच्याशी संबंधित कोणतेही दावे असलेल्या कोणत्याही व्यक्तीनी सर्व आधारीत कागदपत्रे आमच्या हस्तांतरण एजन्टस् आणि प्रबंधकंकडे कार्यालयात म्हणजेच डेटामॅटीक्स बिझनेस सोल्युशन्स लिमिटेड, प्लॉट नं एच१६ आणि १७, पार्ट बी. क्रॉस लेन एमआयडीसी, मरोळ, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०० ०९३, लिखित स्वरुपात सदरहू दावे या सूचनेच्या जाहीराती पासून १५ दिवसामध्ये दाखल केले पाहीजेत, त्यानंतर अशा प्रकारचे दावे विचारात घेतले जाणार नाहीत आणि प्रबंधक जानेवारी ३०, २०२६ रोजीच्या सेबी सर्कुलर क्र. HO/38/13(3)2026-MIRSD-POD/I/3763/2026 च्या अनुसार सिक्युरिटीज थेट सिक्युरिटी धारक / दावेदाराच्या डिमॅट खात्यात जमा करण्याची पुढील प्रक्रिया करतील. यानुसार, मूळ शेअर प्रमाणपत्रे रद्द करण्यात येईल, कोणत्याही व्यक्तिने मूळ शेअर प्रमाणपत्राशी व्यवहार केल्यास त्यांनी तो स्वतःच्या जोखिमीवर करावा आणि बँक कोणत्याही मार्गे त्याकरीता जबाबदार राहणार नाही.

एचडीएफसी बँक लिमिटेड साठी
सही/-
अजय अगरवाल
दिनांक : ३०.१०.२०२६ कंपनी सचिव, गट प्रमुख-सचिवालय आणि गट देखरेख

PUBLIC NOTICE

PMHMM170081022015_3_2 MHMM17-008102-2015

Form No. 4
Addl. Chief Judicial Magistrates Court, Borivali, Mumbai
IN THE COURT OF SHRI. SHIVAJI A. KHALANE
NI Act Special Court (section 138)

0.00-NO.24102026 dtd 30/08/2026.

PROCLAMATION REQUIRING THE APPEARANCE OF A PERSON ACCUSED (See Section 82)

SS CASES S/43021462015
KRISHNA SIDAPA KAMBLE VS SHASHIKANT WAMAN SAWANT
//0
NEXT DATE: 30-10-2026

WHEREAS complaint has been made before me that PANKAJ GANGARAM JOSHI, Age-56 years, R/o. Vice Chairman of THE SURAJYA EDUCATION SOCIETY TRUST, C/o. Vikrant Chawal, Room No.8, Opp. Sai Baba Mandir, Shastri Nagar, Mulund Colony, Mulund (W) has committed (or is suspected to have committed) the offence of DISHONOURED OF CHEQUE punishable under section 138 of the NEGOTIABLE INSTRUMENTS ACT, and it has been returned to a warrant of arrest thereupon issued that the said PANKAJ GANGARAM JOSHI cannot be found, and whereas It has been shown to my satisfaction that the said PANKAJ GANGARAM JOSHI has absconded (or is concealing himself to avoid the service of the said warrant);

Proclamation is hereby made that the said PANKAJ GANGARAM JOSHI, Age- 56 is required to appear at Addl. Chief Judicial Magistrates Court, Borivali, Mumbai before NI Act Special Court (section 138) to answer the said complaint on the day of 30-10-2026.

NI Act Special Court (section 138)
Judicial Magistrate (F.C) | 43rd Court, Borivali, Mumbai

इंडियन ओव्हरसीज बँक

अंधेरी शाखा (०२०९)
सी-२०१, २ रा मजला, वॉटरफोर्ड इमारत, (नवनीत मोटर्सच्या वर), जुहू लेन, अंधेरी (पश्चिम), मुंबई-४०००५८
शाखा कोड : ०२०९ **आयएफएससी :** आयओबीए०००००२०९, **ई-मेल :** iob0209@iob.in **दूर :** ८९२५९५०२०९

ई-लिलाव ०५.१२.२०२६ रोजीस
स्थावर मिळकतींच्या विक्रीकरिता ई- लिलावाकरिता जाहीर सूचना
सिक्युरिटायझेशन अँन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल अॅसेटस् अँन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ अन्वये बँकेकडे गहाण असलेल्या स्थावर मिळकतींची विक्री

ज्याअर्थी, इंडियन ओव्हरसीज बँकेच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी येथील खालील तपशिलानुसार बँकेची थकबाकी अधिक व्याजाच्या वसुलीकरिता ''जे आहे जेथे आहे'', ''जे आहे जसे आहे तत्त्वाने'' आणि ''जे काही आहे'' तत्वावर त्या विक्रीच्या अधिकारासह संबंधित कर्जदारांना सूचनेत नमूद केलेल्या थकबाकी (कलम १३(२) अन्वये) साठी खालील कर्ज खात्यामध्ये अधिनियमाच्या कलम १३(२) अन्वये जारी केलेल्या सूचनेला अनुसरुन सिक्युरिटायझेशन अँन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल अॅसेटस् अँन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ (यानंतर ''अधिनियम'' असा उल्लेख) च्या कलम १३(४) अन्वये खालील मिळकतीचा अन्वयिक कब्जा घेतला आहे आणि ज्याअर्थी थकबाकी चुकती करण्यास संबंधित कर्जदारांनी कसूर केल्यामुळे निम्नस्वाक्षरीकारांनी सदर अधिनियमाच्या कलम १३(४) अन्वये त्यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून सदर मिळकतीच्या विक्रीद्वारे बँकेच्या थकबाकीची वसुली करण्यासाठी प्रस्तावित आहेत. विक्री वेबसाईटवर पुरविलेल्या ई-लिलाव प्लॅटफॉर्ममार्फत निम्नस्वाक्षरीकारांद्वारे करण्यात येईल.

अनु. क्र.	खात्याचे नाव	मिळकतीचा तपशील	कब्जा	बुक थकबाकी* (रक्कम रु. मध्ये)	राखीव किंमत ईएमडी बोली वाढीव रक्कम
१.	**मे. एक्झिमप्रो ग्लोबल प्रायव्हेट लिमिटेड संचालक /हमीदार** श्री. रमेश डी तलरेजा श्रीम. सिद्धिका आर तलरेजा श्री. कुणाल आर तलरेजा श्री. करण आर तलरेजा	**मिळकतीचे वर्णन** फ्लॅट क्र. ५०२, इमारत क्र. २, मीना मंदिर को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी, अनमोल कॉम्प्लेक्स, अंधेरी कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०००५९ येथील मिळकतीचे सर्व भाग आणि विभाग सीमाबध्द खालीलप्रमाणे: **पूर्व :** मोकळी जागा **पश्चिम :** पॅसेज **उत्तर :** फ्लॅट क्र. ५०१ **दक्षिण :** मोकळी जागा	सांकेतिक	**रु. ४,२२,५९,२३५.८० (रुपये चार कोटी बावीस लाख एकोणसाठ हजार दोनशे पस्तीस आणि पंच्याऐंशी पैसे मात्र)** ०४.०७.२०२६ रोजीस	**राखीव किंमत रु. २६१.६२ लाख (१% टीडीएससह)** (रुपये दोन कोटी एकसष्ट लाख बासष्ट हजार मात्र) ***विचाराधीन मिळकतीचे मूल्य रु. ५०.०० लाखांपेक्षा जास्त असल्याने १% टीडीएस समाविष्ट** **बोली रक्कम रु. २६१६२००/-** (रुपये सव्वीस लाख सोळा हजार दोनशे मात्र) **बोली वाढीची रक्कम रु. १०००००/- एक लाख**

* परतफेडीच्या तारखेपर्यंत कराराच्या दराने पुढील व्याजासह आणि खर्च, शुल्क इत्यादींसह परतफेड, काही असल्यास, समायोजित करुन उर्वरित रक्कम.
सदर प्रसिद्धी तारण मत्तेच्या विक्रीसाठी तमाम जनतेकडून निविदा मागवून ई-लिलाव विक्री घेण्यासाठी सरफैसी अधिनियम, २००२ अन्वये सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ९(१) अंतर्गत वरील कर्जाच्या कर्जदार/गहाणवटदार आणि हमीदारांना एक ३० दिवसीय सूचना देखील आहे.
ई-लिलावाची तारीख आणि वेळ : ०५.१२.२०२६ येथे स. ११.०० ते दु. ३.०० दरम्यान १० मिनिटांच्या आपोआप विस्तारासह.
ई-लिलाव सूचनेच्या तपशीलांसाठी कृपया आमच्या वेबसाइट www.iob.in तसेच सेवा प्रदात्याच्या वेबसाइट : https://baanknet.com/eauction-psb/bidder-registration यांचा संदर्भ घ्यावा. इसारा अनामत रक्कम (ईएमडी) एनईएफटी/आरटीजीएसच्या पद्धतीने ऑनलाइन भरावी. ईएमडी रक्कम ०५.१२.२०२६ रोजी दु. ०३:०० वाजेपर्यंत जमा करता येईल.
संपर्क व्यक्ती :

शाखा	नाव	संपर्क क्र.	ईमेल आयडी
अंधेरी शाखा	श्री. एम वेंकटरामुडु	८९२५९५०२०९ / ७९८१२०५९२७	iob0209@iob.in

प्राधिकृत अधिकारी
इंडियन ओव्हरसीज बँक
अंधेरी शाखा

ठिकाण : मुंबई
दिनांक : ३०.१०.२०२६

केनरा बँक Canara Bank

केंद्र सरकार का उपक्रम
A Government of India Undertaking
क्षेत्रीय कार्यालय कोल्हापूर / REGIONAL OFFICE KOLHAPUR

करवीर निवासिनी टॉवर, ३रा मजला,
झोरबा हॉटेल जवळ, गावत मंडई रोड,
शाहूपुरी, कोल्हापूर-४१६००१.
लॅण्डलाईन : ०२३१२९९३५४४,
ई मेल- recoveryrosolapur@canarabank.com

सिक्युरिटायझेशन अॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अॅसेट्स अॅण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट २००२ सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ८(६) च्या तरतुदीन्वये स्थावर मिळकतींच्या विक्रीकरिता ई-लिलाव विक्री सूचना.

विक्री सूचना

सर्वसामान्य जनता आणि विशेषतः कर्जदार आणि हमीदार यांना सूचना याद्वारे देण्यात येते की, खालील वर्णिलेल्या स्थावर मिळकती या तारण धनकोंकडे गहाण आहेत, ज्यांचा कब्जा हा कॅनरा बँक (खालील नमुद संबंधित शाखा) च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी घेतला आहे, त्या **खालील परिशिष्टामध्ये नमुद अशा कर्जदारांकडून** पुढील व्याज आणि इतर खर्चासह कॅनरा बँकच्या खालील परिशिष्टातील नमुद संबंधित शाखेसाठी खालील नमुद रक्कम थकबाकीच्या वसुलीसाठी **''जे आहे जेथे आहे'', ''जे आहे जसे आहे'' आणि ''जे काही आहे तेथे आहे''** तत्त्वाने **३०.११.२०२६ रोजीस** विकण्यात येणार आहेत. संबंधित कर्जदाराच्या संक्षिप्त तपशीलासह खालील परिशिष्टामध्ये मिळकतीची अनुक्रमे राखीव किंमत आणि इसारा अनामत रक्कमेचा तपशील सुद्धा नमुद आहे. **इसारा अनामत रक्कम ३०/११/२०२६ रोजीस दु. १२.०० वा. किंवा पूर्वी जमा करावी.**

लिलावाची तारीख: ३०.११.२०२६ (दु. ०१:०० ते दु. ०२:०० पर्यंत)
ईअर जमा करण्याची अंतिम तारीख: ३०.११.२०२६ (दु. १२.०० पर्यंत)
तपशीलांसाठी BAANKNET.COM वर लॉग इन करा.

अ. क्र.	शाखा तपशील	कर्जदार/ हमीदारांचे नाव	देय रक्कम	मिळकतीचे वर्णन	राखीव किंमत	इअर
१	शिरोडा (१५३७३) शाखा कॅनरा शाखा, **मोबा. ९६३५०२७७९३** आणि ई-मेल आयडी : cb15373@canarabank.com	**श्रीकृष्णा गुरूनाथ लोणे**	**रु. १२,१८,१९७.१६ (रुपये बारा लाख अठरा हजार एकशे सत्याऩ्नव आणि सोळा पैसे मात्र)**	**वरचीकर शिरोडा, ता. वेंगुर्ला, जि. सिंधुदुर्ग-४१६५१८ येथील स. क्र. १०/३७, घर क्र. ३७ वरील जमिन आणि इमारतीच्या समाविष्टित मिळकतीचे ते सर्व भाग आणि विभाग. सीमाबद्धता - करारानुसार**	**रु. १२,५०,०००/- (रुपये बारा लाख पन्नास हजार मात्र)**	**रु. १,२५,०००/- (रुपये एक लाख पंचवीस हजार मात्र)**

विक्रीच्या तपशिलवार अटी आणि शर्तींकरिता कृपया कॅनरा बँक वेबसाईट (www.canarabank.com) मधील पुरविलेल्या 'ई-लिलाव' लिंकचा संदर्भ घ्यावा किंवा कॅनरा बँकेच्या वरील नमुद संबंधित शाखा व्यवस्थापकांना त्यांचा मोबाईल क्र. आणि ई-मेल आयडी वर कोणत्याही कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

दिनांक- ३०.१०.२०२६
ठिकाण- कोल्हापूर

सही/- संदीप विलासराव अटोले
प्राधिकृत अधिकारी, कॅनरा बँक

लदाम अफोर्डेबल हाऊसिंग लि.

नों. कार्यालय : लदाम हाऊस, सी-३३, आयटीआय समोर, वागळे इंडस्ट्रीयल इस्टेट, ठाणे (प) - ४००६०४,
दू. क्र. ०२२ ४६६२९७९७, ईमेल आयडी : compliances@ladam.in,
वेबसाईट : www.ladamaffordablehousing.com
सीआयएन : एल६५९९०एमएच१९७९पीएलसी०२१९२३

(सेबी (एलओडीआर) रेग्युलेशन्स, २०१५ चे रेग्युलेशन ४७(१) (बी))
३० सप्टेंबर, २०२६ रोजी संपलेल्या तिमाही आणि अर्ध वर्षा साठी अलिप्त आणि एकत्रित अलेखापरीक्षित वित्तीय निष्कर्षांचे विवरण

रु. लाखात

अ. क्र.	तपशील	अलिप्त			एकत्रित		
		३०/०९/२०२६ रोजी संपलेल्या तिमाहीसाठी (अलेखापरीक्षित)	३१/०३/२०२६ रोजी संपलेल्या मागील वर्षासाठी (लेखापरीक्षित)	३०/०९/२०२५ रोजी संपलेले मागील वर्षात संलग्न ३ महिने (अलेखापरीक्षित)	३०/०९/२०२६ रोजी संपलेल्या तिमाहीसाठी (अलेखापरीक्षित)	३१/०३/२०२६ रोजी संपलेल्या मागील वर्षासाठी (लेखापरीक्षित)	३०/०९/२०२५ रोजी संपलेले मागील वर्षात संलग्न ३ महिने (अलेखापरीक्षित)
१	प्रवर्तनातून एकूण उत्पन्न	१३.९१९	१५.६४१	३.७८३	१५.२७२	२५.३९५	४.७४०
२	कालावधीसाठी निव्वळ नफा/(तोटा) (कर, अपवादात्मक आणि किंवा अनन्यसाधारण बाबींपूर्व #)	४.६६६	-१७.५६४	-१.१४४	४.६२५	-१७.०५२	-०.९४२
३	कालावधीसाठी करपूर्व निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक आणि/किंवा अनन्यसाधारण बाबींनंतर#)	४.६६६	-१९६.२८१	-१.१४४	-११७.०१४	-२७.५११	-०.९४२
४	कालावधीसाठी करोत्तर निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक आणि/किंवा अनन्यसाधारण बाबींनंतर#)	४.६६६	-१९६.२८१	-१.१४४	-११७.०१४	-२७.६९१	-०.९४२
५	कालावधीसाठी एकूण सर्वसमावेशक उत्पन्न (कालावधीसाठी नफा/(तोटा) (करोत्तर) आणि इतर सर्वसमावेशक उत्पन्न (करोत्तर) धरून)	४.७०९	-१९६.४४२	-१.०९१	-११६.९७१	-२७.८५२	-०.८८९
६	समभाग भांडवल	९१५.२३०	९१५.२३०	९१५.२३०	९१५.२३०	९१५.२३०	९१५.२३०
७	मागील वर्षाच्या लेखापरीक्षित ताळेबंदात दाखवल्यानुसार राखीव (पुनमूर्ल्यांकित राखीव वगळून)		११४२.६९७			१७१३.६४३	
८	प्रति भाग प्राप्ती (प्रत्येकी रु. ५/- चे) (अखंडित व खंडीत कामकाजासाठी) मुलभूत : सौम्यिकृत :	०.०२५ ०.०२५	-१.०७२ -१.०७२	-०.००६ -०.००६	-०.६३९ -०.६३९	-०.१५१ -०.१५१	-०.०३७ -०.०३७

टीपा :
ए) वरील माहिती म्हणजे सेबी (लिस्टींग अँड अदर डिस्क्लोजर रिक्वायरमेंटस) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ३३ अन्वये स्टॉक एक्स्चेंजेस कडे दाखल केलेल्या तिमाही अलेखापरीक्षित वित्तीय निष्कर्षांच्या तपशिलवार विवरणाचा उतारा आहे. तिमाही अलेखापरीक्षित वित्तीय निष्कर्षांचे संपूर्ण विवरण स्टॉक एक्स्चेंजची वेबसाईट www.bseindia.com वर आणि कंपनीची वेबसाईट www.ladamaffordablehousing.com वर उपलब्ध आहे.
बी) लेखा धोरणातील बदलांमुळे निव्वळ नफा/तोटा, एकूण सर्वसमावेशक उत्पन्न किंवा अन्य कोणत्याही संबंधित बाबींवरील परिणाम तळटीपेच्या स्वरुपात कळवला जाईल.
सी) # -अपवादात्मक आणि/किंवा अनन्यसाधारण बाबी प्रयोज्य असेल त्याप्रमाणे इंड-एएस रुल्स/एएस रुल्स नुसार नफा आणि तोटा विवरणांत समायोजित केल्या आहेत.

लदाम अफोर्डेबल हाऊसिंग लिमिटेड साठी
सही/-
सुमेश अगरवाल
अध्यक्ष, संचालक आणि सीईओ
डीआयएन : ००३२५०६३

दिनांक : २९ ऑक्टोबर, २०२६
ठिकाण : ठाणे

भारत को-ऑपरेटिव्ह बँक (मुंबई) लि.

(मल्टि-स्टेट शेड्युल्ड बँक)
मध्यवर्ती कार्यालय: ''मरुतागिरी'', प्लॉट क्र. १३/९ए, सोनावाला रोड, गोरेगाव (पूर्व), मुंबई - ४०००६३.
दू. :- ६१८९०१३४/६१८९००८३.

मागणी सूचना

सिक्युरिटायझेशन अँण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनाशिअल अॅसेटस् अँण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ (सरफैसी अॅक्ट, २००२) च्या कलम १३(२) अन्वये सूचना

१. सिक्युरिटायझेशन अँण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनाशिअल अॅसेटस् अँण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ च्या कलम १३(२) अन्वये तुम्हाला याद्वारे सूचना देण्यात येत आहे. सदर सूचना ही रजिस्टर्ड ए. डी. पोस्ट/स्पीड पोस्टाने तुमच्या अंतिम ज्ञात पत्त्यावर पाठविलेल्या सूचनेच्या व्यतिरिक्त प्रकाशित करण्यात येत आहे.

२. तुमच्या विनंतीवरून भारत को-ऑपरेटिव्ह बँक (मुंबई) लि. ने तिच्या खालील नमुद शाखेमार्फत संबंधित मंजुरी पत्रामध्ये नमूद अटी आणि शर्तींनुसार त्यावर तारण हितसंबंध निर्माण करून येथे खालील वर्णन केलेल्या मिळकतीच्या गहाण/जंगमगहाण सापेक्ष वित्तीय सहाय्य मंजूर केले.

३. तुम्ही कर्ज रक्कम प्रदान करण्यात कसूर आणि टाळाटाळ केली आणि त्यामुळे वरील सदर वित्तीय सहाय्य/पतसुविधा खालील तपशिलानुसार एनपीए बनली. सिक्युरिटायझेशन अँण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनाशिअल अॅसेटस् अँण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ (यानंतर सरफैसी अॅक्ट किंवा सदर अॅक्ट असा उल्लेख) च्या कलम १३(२) अन्वये मागणी सूचना ही रजिस्टर्ड पोस्ट ए. डी. पोस्ट/स्पीड पोस्टाने तुमच्या अंतिम ज्ञात पत्त्यावर पाठविण्यात आली होती.

४. त्यामुळे सदर अॅक्ट अंतर्गत प्राधिकृत अधिकारी असलेले निम्नस्वाक्षरीकार, याद्वारे सदर प्रकाशनामार्फत सदर सूचना प्रसिद्धी तारखेपासून ६० दिवसांत खालील नमूद कर्ज खात्याच्या संदर्भातील तुमचे खालील नमूद संपूर्ण दायित्व निभावण्यासाठी तुम्हाला बोलावणे करीत आहोत आणि कसूर केल्यास बँक वरील सदर अॅक्टच्या कलम १३ च्या पोटकलम ४ अन्वये आणि सदर अॅक्टच्या इतर प्रयोज्य तरतुदीन्वये तपशील दिलेल्या सर्व किंवा कोणत्याही अधिकाराचा वापर करेल.

५. तुम्हाला ही सुद्धा सूचना देण्यात येते की कलम १३ च्या पोटकलम (१३) नुसार तुम्ही बँकेची लेखी सहमती प्राप्त केल्याशिवाय सदर सूचनेच्या परिशिष्ट ''सी'' मध्ये तपशील दिलेल्या सदर तारण मत्ता विक्री, भाडेपट्टा किंवा अन्य मार्गाने हस्तांतर करू शकत नाही.

६. सदर बँकेने सदर कर्ज खात्याअंतर्गत संपूर्ण दायित्व आणि त्यानंतर उद्भवणारे इतर आकस्मित दायित्व चुकते करण्यासाठी तुम्हाला बोलाविण्याचा हक्क राखून ठेवला आहे.

७. सदर सूचना ही कायद्याच्या इतर प्रयोज्य तरतुदींव्यवे आवश्यक मानल्यानुसार अशी अन्य कारवाई आणि/किंवा कायदेशीर प्रक्रिया सुरू करण्यासाठी बँकेच्या हक्काला बाधा येऊ न देता आहे. तुम्ही प्रयोज्य सुसार सदर अॅक्टअंतर्गत कारवाईसाठी काही असल्यास सेवा प्रभार/परिव्यय/खर्च चुकता करण्यासाठी बांधील आहात.

८. तुम्ही तुमच्या कर्ज खात्याशी संबंधित तुम्ही निष्पादित केलेले कर्ज दस्तावेज आणि बँकेने ठेवलेल्या हिशोबाच्या विवरणाचे निरीक्षण करण्यासाठी मुक्त आहात.

९. विशेषतः सदर कर्जदार व सामान्य जनतेस याद्वारे इशारा देण्यात येतो की, त्यांनी सदर मालमत्तेसह कोणताही व्यवहार करू नये व सदर मालमत्तेशी केलेला कोणताही व्यवहार भारत को-ऑपरेटिव्ह बँक (मुंबई) लि. च्या भाराअधीन असेल.

१०. अधिक तपशिलाकरिता न बजावणी केलेली लेखी सूचना निम्नस्वाक्षरीकारांकडून प्राप्त करू शकता.

अ. क्र.	कर्जदार/संयुक्त-कर्जदार/ हमीदार/ कायदेशीर वारसदारांचे नाव	एनपीए तारीख/ मागणी सूचना तारीख	शाखा/कर्ज खाता क्र./ एकूण थकबाकी रक्कम	तारण मत्ता/मिळकत/तींचे वर्णन
१	१. श्री. दीपक मनोहर चतुर्वेदी **संयुक्त/सह-कर्जदार :** २. सौ. पुष्पा मनोहर चतुर्वेदी **हमीदार :** ३. श्री. विवेक कुमार अवधेश मिश्रा	**एनपीए तारीख:** ३०.०८.२०२६ **सूचना तारीख:** १५.१०.२०२६	**मिरा रोड (पूर्व) शाखा** **i) ००१७३३६७०००००१७३** रु. १४,३०,८८२/- ३०.०९.२०२६ रोजीस थकबाकीसह ०१.१०.२०२६ पासून पुढील व्याज आणि प्रभार **ii) ००१७३३३७०००६६५१२** रु. ४,९३,९८५/- ३०.०९.२०२६ रोजीस थकबाकीसह ०१.१०.२०२६ पासून पुढील व्याज आणि प्रभार	श्री. दिपक एम. चतुर्वेदी आणि सौ. पुष्पा मनोहर चतुर्वेदी यांच्याद्वारे संयुक्त मालकीचे नोंदणीकृत उप जिल्हा आणि जिल्हा ठाणे, अमृतवाणी सत्संग मार्ग, मॅक्सस मॉलच्या मागे, भाईंदर पश्चिम, ठाणे ४०१ १०१ मधील गाव भाईंदर, तालुका आणि जिल्हा ठाणेच्या जुना सर्व्हे क्र. ६७१ नवीन सर्व्हे क्र. २६१ हिस्सा क्र. १बी, १, २, ३, ४ धारक जमिनीवर बांधकामित ''श्री साई केशव माधव टॉवर'', श्री साई केशव माधव टॉवर को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि. अशा ज्ञात इमारतीच्या चौथ्या मजल्यावर स्थित फ्लॅट क्र. ४०३, मोजमापित ४३५ चौ. फू. बिल्ट अप क्षेत्र (सुपर बिल्ट अप क्षेत्र ४८.५१ चौ. मी.) त्यासह शेअर प्रमाणपत्र क्र. १६ अंतर्गत सोसायटीच्या भांडवलातील शेअर, हक्क, नामाधिकार आणि हितसंबंध.
२	१. श्री. मोहम्मद आसिफ युसुफ दलखानिया मे. एम. ए. कॉन्सचे मालक **हमीदार :** २. श्री. मोहम्मद आवेश आसिफ दलखानिया	**एनपीए तारीख:** ३०.०६.२०२६ **सूचना तारीख:** १९.१०.२०२६	**सांताक्रूझ (पश्चिम) शाखा** **००२८१४९०००००२५१** रु. ८२,०५,५११/- ३०.०९.२०२६ रोजीस थकबाकीसह ०१.१०.२०२६ पासून पुढील व्याज आणि प्रभार